RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १८८(४)] बुधवार, डिसेंबर ३१, २०२५/पौष १०, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४८२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३१ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२२/प्र.क्र.३४/रस्ते-८.—मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६५) याच्या कलम २० ची पोट - कलमे (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, खाजगीकरणाच्या माध्यमातून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या योजनेतून छत्रपती संभाजीनगर शहरातील नव्याने बांधण्यात आलेले रस्ते, पूल, उड्डाणपुलाच्या पोचमार्गासह बांधलेले उड्डाणपूल, रस्त्याचे भाग, पोचमार्गासह बांधलेले वळणमार्ग आणि रेल्वे उड्डाणपूल यांची करण्यात येणारी बांधणी, पुनर्बांधणी, सुधारणा किंवा दुरूस्ती किंवा छत्रपती संभाजीनगर शहर एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमाचा भाग असलेल्या (सदर अधिसूचनेच्या टिपमध्ये विशेषत्वाने सविस्तररित्या वर्णन केल्याप्रमाणे) कामांचा समूह छत्रपती संभाजीनगर शहरातील एक सुनिश्चित क्षेत्र निश्चित करून कलम २० च्या प्रयोजनासाठी नव्याने निर्देशित केलेले दर व कालावधीसाठी साकल्याने एकच मानण्यात येईल. या कामांचा वापर करणाऱ्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने, दिनांक ०१ जानेवारी २०२६ ते दिनांक ३१ मार्च २०२६ या कालावधीकरिता खालील पथकर नाक्यांवर पथकर बसविण्यात आला आहे व तो पुढे चालू ठेवण्यात येत आहेः-

(अ) छत्रपती संभाजीनगर - जळगांव रस्ता, (प्रमुख राज्य मार्ग ८) कि.मी. २३८/७०० सावंगी गावाजवळ.

(ब) छत्रपती संभाजीनगर - पैठण रस्ता (राज्य मार्ग ३०) कि.मी. ३३६/८००, नक्षत्रवाडीजवळ.

(क) छत्रपती संभाजीनगर - लासुर रस्ता (राज्य मार्ग ३०) लासुर.

**अनुसूची**

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | ०१/०१/२०२६ ते ३१/०३/२०२६ |
| १. | स्कूटर, मोटार सायकल, चालका व्यतिरिक्त तीन प्रवासी वाहन क्षमता असलेल्या ऑटोरिक्षा, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर. | निरंक |
| २. | मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने, | |
| | (अ) कार, जीप, टाटा सुमो, ट्रॅक्स, वाहन चालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा, कमांडर व इतर तत्सम वाहने (चालक वगळुन) १२ पर्यंत प्रवासी क्षमता असलेली वाहने टमटम इ. | निरंक |
| | (ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालका व्यतिरिक्त १२ पेक्षा अधिक आणि २० पर्यंत प्रवासी वाहन क्षमतेची) आणि मालवाहु वाहने अनुक्रमांक १, ३ व ४ येथे नमूद नसलेली वाहने. | ६० |
| ३. | ट्रक, बस. | १०५ |
| ४. | मोटार वाहन अधिनियम- १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेली वाहने वगळून अवजड वाहने उदा. ट्रक-ट्रेलर, दोन पेक्षा अधिक आसांची वाहने. | १२५ |

**टिपा. –**

(१) या रस्ते व पुलांच्या सुनिश्चित समूहात छत्रपती संभाजीनगर शहरातील पाच उड्डाणपुलांचे बांधकाम, जालना रस्त्यावरील लाडगांव, झाल्टा वळणरस्ता, बीड वळणरस्त्यावरील शिवाजीनगर व संग्रामनगर आणि अहमदनगर नाका येथील रेल्वे उड्डाणपूल, शेंद्रा औद्योगिक वसाहत ते चिखलठाणा रस्त्याचे व झाल्टा वळणरस्त्याचे चौपदरीकरण, बीड वळणरस्त्याचा सेवा रस्ता, छत्रपती संभाजीनगर - पैठण व छत्रपती संभाजीनगर - अहमदनगर या रस्त्यांना जोडणारा पैठण लिंक रोड, छत्रपती संभाजीनगर -अहमदनगर ते तीसगांव-लासूर रेल्वे स्टेशन रस्त्याचे बांधकाम, छत्रपती संभाजीनगर-पैठण राज्य महामार्गाचे (राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जाप्रमाणे) सुधारणा, गंगापूर फाटा ते वाळुज रस्त्याच्या बाजूपट्ट्यांचे बांधकाम यांचा समावेश असेल.

(२) वाहन धारकाने ५० किंवा १०० कुपन असलेली पथकर पुस्तिका आगाऊ खरेदी केल्यास यासाठी त्यास पुस्तिकेच्या किंमतीमध्ये अनुक्रमे २५ टक्के व ५० टक्के सवलत देण्यात येईल.

(३) खालील वाहनांना पथकरातून सूट देण्यात येईल.

*(१)* अतिमहत्वाच्या व्यक्तींची वाहने जसे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, विविध राज्यांचे राज्यपाल, लाल दिवे लावण्याचा अधिकार असलेली लोकप्रतिनिधींची वाहने.

*(२)* लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधान परिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

*(३)* लोकसभा व राज्यसभेचे माजी सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

*(४)* शासकीय वाहने.

*(५)* संरक्षण खात्याची वाहने.

*(६)* पोलीस वाहने.

*(७)* अग्निशमन दलाची वाहने.

*(८)* रुग्णवाहिका.

*(९)* शववाहिका.

*(१०)* टपाल व तार खात्याची वाहने.

*(११)* महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस.

*(१२)* शालेय विद्यार्थांची वाहतूक करणाऱ्या बसेस.

(४) या प्रयोजनाकरीता उपरोल्लेखित रस्त्यावरील या अधिसूचनेत नमूद केलेल्या पथकर नाक्यांवर पथकराची संपूर्ण रक्कम वसुली करण्याचा आणि ठेवुन घेण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 31st December 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No. PSP-2022/C.R.34/Road-8.—In exercise of the powers conferred by sub-sections (1-A), (1-B), (1-C), (1-D) and (1-E) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby declares that the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the *Schedule* appended hereto and on the trailors drawn by such motor vehicles, passing over any of the newly constructed flyover bridges, railway over bridges or roads constructed, reconstructed, improved or repaired as the case may be, the cluster of which is situated within the Chhatrapati Sambhajinagar City (more particularly described in the note appened hereinafter), which is declared as one single entity for the purposes of the said section 20 of the said Act, under 'Build, Operate and Transfer (BOT)' Basis by the Maharashtra State Road Development Corporation Limited, Mumbai, at the rates specified against each of the said vehicles in column (3) of the said *Schedule*, with affect from the 1st January 2026 to 31st March 2026, at toll collection centers constructed on,-

*(a)* near Sawangi Village on Chhatrapati Sambhajinagar - Jalgaon Road (M.D.R.-8) at Kilometer 238/700,

*(b)* Nakshatrawadi Village on Chhatrapati Sambhajinagar - Paithan Road (S.H.-30), at Kilometer 336/800, and

*(c)* near Lasur Village on Chhatrapati Sambhajinagar - Lasur Road (S.H.-30).

*SCHEDULE*

| **Sr. No.** | **Particulars of Motor Vehicles** | **Rates of toll per trip in rupees** |
|---|---|---|
| **(1)** | **(2)** | **(3)** |
| | | **01.01.2026 to 31.03.2026** |
| 1. | Scooter, Motor Cycle, Moped or any other two wheeler, Tractor and Tractor with unladen trolley Auto Rickshaw registered to carry three passengers excluding driver. | NIL |
| 2. | Light Motor Vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988),- | |
| | (a) Car, Jeep, Tata Sumo, Trax, Six Commander or any other vehicles having carriage capacity upto twelve passengers (excluding driver), Tum - Tum etc. | NIL |
| | (b) Mini bus or any other similar vehicles (having carriage capacity of more than twelve and upto twenty passengers, excluding driver) and goods carriage vehicles except vehicles included in entries at serial numbers 1, 3 and 4. | 60 |
| 3. | Truck, Buses. | 105 |

| Sr. No. | Particulars of Motor Vehicles | Rates of toll per trip in rupees |
|---|---|---|
| 4. | Heavy goods vehicles and heavy passenger motor vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), such as Truck-Trailers combination, Multi-axle Vehicles, etc., except vehicles covered by the entry at serial number 3 above. | 125 |

**Notes. -**

(1) The cluster of the Roads and Bridge shall include the constructions of Flyover Bridges in Chhatrapati Sambhajinagar city; construction of RoB's at Ladgaon on Jalna Road, Zalta Bypass, near Shivajinagar and Sangramnagar on Beed Bypass Road and Ahmednagar Naka, Four laning of Shendra Industrial area to Chikalthana and Zalta Diversion; Service Road to Beed Bypass Road, Construction of Paithan Link Road Joining Chhatrapati Sambhajinagar – Paithan Road and Chhatrapati Sambhajinagar - Ahemadngar Highway to Tisgaon - Lasur Station Road; Improvement (to national highway standard) of Chhatrapati Sambhajinagar Paithan Road; and providing hard shoulders to Gangapur phata to Waluj.

(2) A vehicle owner who purchases a toll coupon book in advance containing 50 or 100 coupons, will be given a discount of 25 per cent. and 50 per cent. respectively.

(3) The following types of vehicles are exempted from payment of toll namely :-

*(i)* VVIP Vehicle carrying President of India, Vice President of India, Governor of States, Public Representatives entitled for red lamp on vehicles.

*(ii)* Vehicle carrying sitting Members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

*(iii)* Vehicle carrying ex-members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

*(iv)* Government Vehicles.

*(v)* Defence Vehicles.

*(vi)* Police Vehicles.

*(vii)* Fire Fighting Vehicles.

*(viii)* Ambulances.

(ix) Hearses.

*(x)* Vehicles of Posts and Telegraphs Department.

*(xi)* Buses of Maharashtra State Road Transport Corporation.

*(xii)* Buses carrying School Children.

(4) For this purpose, the Maharashtra State Road Development Corporation Limited, Mumbai, is authorized to collect and retain the amount of toll at the above toll collection centers.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANDEEP KHALATE
Deputy Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.